पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

मा.महिला व बालकल्याण समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - १७**

सभावृत्तांत

दिनांक - **२३/०९/२०२१** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा **गुरुवार** दिनांक **२३/०९/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि. ०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

**१. मा.लोखंडे चंदा राजू - सभापती**

२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३. सविता बाळकृष्ण खुळे

४. मा.राजापुरे माधवी राजेंद्र

५. मा.गायकवाड निर्मला मनोज

६. मा.कदम निकीता अर्जुन

७. अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.सुहास बहादद्रपुरे - समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.२) महिला व बालकल्याण समिती सदस्यांची अभ्यास सहल आयोजित करणे बाबत. मा.योगीता नागरगोजे व मा.माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमध्ये मोफत टॅब पुरविणेबाबत. मा.माधवी राजापुरे व मा.योगीता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०९/०९/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र. १६) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ४६ | विषय क्रमांक - ०१ |
| दिनांक - २३/०९/२०२१ | विभाग- नागरवस्ती |
| सुचक - मा.सविता खुळे | अनुमोदक - मा.माधवी राजापुरे |

संदर्भ - मा.उप आयुक्त, नागरवस्ती विकास योजना विभाग यांचेकडील पत्र
क्र.नाविंयो/०२/कावि/५६/२०२१, दिनांक - ०४/०८/२०२१.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत मनपा हद्दीतील नागरिकांकरिता विविध कल्याणकारी योजना राबविणेत येतात. त्याअनुषंगाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे WE-YUVA चॅलेंज स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुषंगाने सदर स्पर्धेची मनपा हद्दीतील मुली/युवती/महिलांमध्ये जास्तीत जास्त प्रसिद्धी व जनजागृती व्हावी जेणेकरुन जास्तीत जास्त स्पर्धकांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावा. याकरिता रेडीओ सिटी ९१.१ एफम व रेडिओ मिर्ची ९८.३ एफम या रेडिओ वाहिन्या ऐकणारा महिला प्रेक्षक वर्ग हा जास्त असलेने सदर स्पर्धेचे जाहिरातीचे कामकाज आदेश क्र.नाविंयो/०२/कावि/२५/२०२१ दि.२५/०३/२०२१ अन्वये सदरचे दोन रेडिओ वाहिन्यांना देणेत आलेले आहे. सदर कामकाज पुर्ण झालेनंतर दोन्ही

संस्थांनी झालेल्या कामकाजाचे बिल सादर केलेले असून ते खालील तक्त्यात नमुद केलेले आहे.

| अ. क्र. | शहर | स्टेशन | दिवस | स्पॉट्स वारंवरता | स्पॉट्स/ जाहिरात कालावधी (सेकंद) | एकुण सेकंद | दर/१० सेकंद | किंमत | एकुण रक्कम (१८% GST) सह |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | रेडिओ सिटी ९१.१ | १० | १५ | ३० | ४५०० | ४०० | १,८०,०००/- | २,१२,४००/ |
| २ | पुणे | रेडिओ मिर्ची ९८.३ | १० | १५ | ३० | ४५०० | ४०० | १,८०,०००/- | २,१२,४००/ |

WE-YUVA चॅलेंज स्पर्धेची जाहिरातीचे कामकाज रेडिओ सिटी ९१.१ एफम व रेडिओ मिर्ची ९८.३ एफम यांनी सादर केलेल्या दरपत्रकानुसार दि.२४/०३/२०२१ पासून दि.०२/०४/२०२१ पर्यंत (एकूण १० दिवस) तातडीची बाब म्हणुन कामकाज करणेस तसेच सदर जाहिरातीकरीता लागणारी तरतुद महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत येणा-या महिला दिन या उपलेखाशिर्षामधून खर्च करणेस आदेश देणेत आलेला असलेने तातडीची बाब म्हणून राबविलेल्या कामकाजास कार्योत्तर मान्यता देणकामी मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ४७      विषय क्रमांक - ०२

दिनांक - २३/०९/२०२१

सुचक - मा.योगीता नागरगोजे      अनुमोदक - मा.माधवी राजापुरे

संदर्भ - मा.योगीता नागरगोजे व माधवी राजापुरे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यात येतात. तरी महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने माहिती घेणे व पाहणी

करणे याकामी बेंगलोर येथे महिला व बालकल्याण समिती सदस्यांची अभ्यास सहल आयोजित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदरचा विषय आवश्यक त्या खर्चाच्या मान्यतेकामी मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४८ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २३/०९/२०२१

सुचक - मा.माधवी राजापुरे अनुमोदक - मा. योगीता नागरगोजे

संदर्भ - मा.माधवी राजापुरे व मा.योगीता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध लोककल्याणकारी योजना राबविले जातात. पिंपरी चिंचवड शहरातील माध्यमिक शाळा ह्या एकुण १८ शाळा आहेत व ह्या माध्यमिक शाळा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या असल्याने Covid-१९ च्या पार्श्वभुमीवर शाळा बंद असल्यामुळे सर्व अभ्यासक्रम हा Online पद्धतीने चालू आहे. परंतु महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळेतील बऱ्याचशे विद्यार्थी हे गरिब कुटुंबातील आहेत. त्यांच्याकडे Online अभ्यास करण्यासाठी आवश्यक असणारे मोबाईल / टॅब / लॅपटॉप अशी साधणे नसल्यामुळे विद्यार्थी Online पद्धतीने अभ्यास करु शकत नाहीत. त्यामुळे Online शिक्षण घेताना अडचणी निर्माण होतात. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील एकुण ८२१५ इतक्या पटसंख्येनुसार विद्यार्थ्यांना नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत मोफत टॅब खरेदी करुण देणेकामी आवश्यक त्या खर्चाच्या मान्यतेकामी मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( लोखंडे चंदा राजू )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/४५६/२०२१
दिनांक : २९/०९/२०२१



**(** उल्हास बबनराव जगताप **)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.